# नाशिक जिल्हा परिषद नाशिक

**(सामान्य प्रशासन विभाग)**

**दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०**

---

**जाक्र/साप्रवि/आस्था-६/ ३१२/२०१७**
**नाशिक दिनांक:- १३/०७/२०१७**

**प्रति,**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**विषय :- जिल्हा परिषद वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या सर्व साधारण बदल्या सन -२०१७ अतर्गत बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे दि.१/६/२०१७ पासून मुळ पदस्थापना ठिकाणी वेतन व भत्ते अदा न करणे बाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-६/ /२०१७ दिनांक :- २६/०६/२०१७**

उपरोक्त संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. प्रस्तुत संदर्भीय पत्रान्वये मे,२०१७ मध्ये जिल्हा परिषद वर्ग-३ संवर्गाच्या प्रशासकीय व विनंती बदल्या करण्यात आलेल्या आहे. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना बदली आदेशातील अटी शर्ती नुसार दिनांक ३१ मे, २०१७ रोजी संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी कार्यमुक्त करणे बाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहे. परंतु काही कार्यालय प्रमुख यांनी बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना अद्याप कार्यमुक्त केलेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच दिनांक ३१ मे, २०१७ रोजी कार्यमुक्त न केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा न करणेबाबत आपणास निर्देश दिलेले आहे.

या पत्रान्वये आपणास पुन:श्च निर्देश देण्यात येत आहे. ज्या बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना बदली झालेल्या ठिकाणी अद्यापही कार्यमुक्त केलेले नाही. अशा कार्यालय प्रमुखांचे पुढील आदेश होईपावेतो वेतन व भत्ते थांबविण्यात यावे. व अशा कार्यालय प्रमुखांची नांवे माझेकडेस दिनांक २० जुलै, २०१७ पावेतो लेखी स्वरूपात कळवावे.

Deepak
13/07

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**